द्राक्ष सल्ला

# वाढता ओलावा, आर्द्रतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या

डॉ. आर. जी. सोमकुंवर

**द्राक्ष विभागात गेल्या काही दिवसांपासून पाऊस व ढगाळ वातावरण दिसून येते. या वातावरणात जमिनीमध्ये पाणी साचले असेल. ओलावाही वाढला असेल. यामुळे आर्द्रताही तितक्याच प्रमाणात वाढली असेल. वेलीची वाढ जोमात होताना दिसेल. आपल्याकडे वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेत असलेल्या बागेत खालील अडचणी दिसून येतील. त्यावर संभाव्य उपाययोजनांची माहिती घेऊ.**

## फुटींची वाढ जोमात होणे

पाऊस व त्यानंतर उघडीप ही परिस्थिती बागेत फुटीची वाढ जोमात होण्यास मदत करते. जमिनीत वाढलेला ओलावा व त्यानंतर अचानक वाढलेली आर्द्रता, उपलब्ध ढगाळ वातावरण यामुळे द्राक्षवेलीमध्ये शरीरशास्त्रीय हालचालींचा समतोल बिघडताना दिसतो. या वेळी वेलीतील सायटोकायनीनचे प्रमाण कमी होते, जिबरेलिन्स प्रमाण वाढते. यामुळे फुटींची वाढ जोमात होते. इतकेच नाही, तर दोन ओळींच्या मध्यभागी नव्या पांढऱ्या मुळ्यांची वाढ होते. त्यांच्याद्वारे गेल्या हंगामात कधीही वापरात न आलेले अन्नद्रव्यांचे शोषण होते. वेलीस अन्नद्रव्यांचा पुरवठा वाढतो. पांढरी मुळे ही संजीवकांची निर्मितीही तितक्याच प्रमाणात करत असल्याने वाढीचा एकंदरीत जोम जास्त होतो. त्यामुळे बगलफुटी वाढलेल्या दिसतात, त्यासोबत शेंडाही वाढतो. ही परिस्थिती निर्माण झालेली असल्यास रोगांचा प्रादुर्भावसुद्धा वाढेल व काही परिस्थितीत (उशिरा छाटलेल्या बागेत) सूक्ष्मघड निर्मितीवर विपरीत परिणाम होतील.

**उपाययोजना**

बागेतील ठिबकद्वारे दिले जाणारे पाणी बंद करणे. फवारणीच्या माध्यमातून पालाशयुक्त खतांची (०-०-५० हे खत ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी) फवारणी काडी परिपक्वतेच्या अवस्थेत असलेल्या बागेत करावी. उशिरा छाटलेल्या बागेत सूक्ष्मघडनिर्मिती शेवटच्या टप्प्यात असलेल्या परिस्थितीत ०-४०-३७ हे खत २.५ ते ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. तसेच दीड ते दोन किलो प्रति एकर या प्रमाणे पंधरा ते २० दिवसांपर्यंत जमिनीतून द्यावे. ठिबकचा वापर फक्त खते देण्यापुरताच करावा. निघत असलेल्या बगलफुटी काढून घ्याव्यात. शेंडा पिंचिंगही त्वरित करावे. बागेत दोन ओळींच्या मध्यभागी नांगराच्या साह्याने चारी घ्यावी. यामुळे बोदातील पाणी निघून जाईल. मुळांच्या कक्षेतील वातावरण मोकळे राहील.

## घड निघण्याची समस्या

काडीची परिपक्वता होत असलेल्या बागेत सध्याच्या वातावरणामुळे वेलीचा जोम जास्त प्रमाणात वाढताना दिसतो. घडाच्या विकासासाठी प्रत्येक काडीवर १६ ते १७ पाने पुरेशी असतात. यानंतरची पाने काढून टाकावी लागतात. बऱ्याचदा बागेत एकतर मजुरांची उपलब्धता किंवा पावसाळी वातावरण यामुळे करणे शक्य होत नाही. त्यामुळे फुटीची वाढ २० ते २२ पानांपर्यंत होते. अशा वेळी बागायतदार १६ ते १७ पानावर शेंडा मारून वाढ थांबविण्याचा प्रयत्न करतात. यालाच 'हार्ड पिंचिंग' असेही म्हटले जाते. या वेळी वाढीकरिता पोषक वातावरण उपलब्ध असल्यामुळे पिंचिंग करताच त्वरित नव्या बगलफुटी अधिक जोमाने वाढताना दिसतील. त्याच प्रत्येक बगलफुटीवर द्राक्षघड निघालेला दिसून येतो. त्या वेळी मात्र बागायतदार घाबरून जातात. काडीच्या तळापासून ३ ते ४ डोळे सोडून वरील प्रत्येक डोळ्यामध्ये घड असतो. यामध्ये महत्त्वाचा घड ६ ते ८ डोळ्यांमध्ये असतो. नवीन फुटीमध्ये जर आताच इतके घड निघाले तर पुढे काय होईल, असा प्रश्न पडतो. मात्र असे काही नाही. फुटीच्या पुढील भागात निघालेला घड आपल्या कामाचा नसेल व तो घड निघाल्यामुळे खालील घडाचे नुकसान होणार नाही.



**उपाययोजना**

ही परिस्थिती टाळण्याकरिता महत्त्वाचे म्हणजे हार्ड पिंचिंग करणे टाळावे. त्यापेक्षा फक्त शेंड्याकडील फूट खुडून घ्यावी. यालाच 'टिकली मारणे' असेही म्हणतात. या परिस्थितीत पालाशचा वापर करून (फवारणी व जमिनीतून) वाढ नियंत्रणात ठेवता येईल. यासोबत पाऊस नसल्यास पाण्यावर नियंत्रण महत्त्वाचे असेल.

## टायगर बड फुटण्याची समस्या

बऱ्याचशा बागेत द्राक्ष बागायतदार वेलीची वाढ नियंत्रणात ठेवण्यासाठी विविध वाढ विरोधकांचा वापर करतात. नवीन बागेमध्ये ओलांडा टप्प्याटप्प्याने तयार होतो. तसेच त्या ओलांड्यावर मालकाड्यासुद्धा एकावेळी तयार होत नाहीत. म्हणून सायटोकायनीनयुक्त संजीवकांचा बऱ्यापैकी वापर करतात. परिणामी वेलीमध्ये सायटोकायनीनचे प्रमाण जास्त वाढते. आधीच जमिनीत ओलावा जास्त वाढलेला आहे. वातावरणातील आर्द्रता वाढलेली आहे. हवेतील नत्र शोषून घेतल्यामुळे वाढ जोमात होण्याची परिस्थिती निर्माण होते. वाढ होऊ नये म्हणून बगलफुटी आणि शेंडा खुडला जातो. यावेळी मात्र अन्नद्रव्य व पाण्याचे वहन जास्त जोराने होत असल्याने फुटीच्या वाढीवर दाब निर्माण होतो. या बागेत आपण सबकेन तयार केला होता. यावेळी शेंड्याकडील व बगलफुटी काढून टाकल्याने हा नाजूक व कोवळा डोळा शिल्लक राहतो. या डोळ्यावर दाब जास्त येतो. त्यामुळे नवीन फुटी बाहेर निघतात. ही परिस्थिती पुढील हंगामात पीक घेण्याच्या दृष्टीने फायद्याची नाही. म्हणजेच हा 'टायगर बड' फुटणे टाळण्याची आवश्यकता आहे.

**उपाययोजना**

सायटोकायनीनयुक्त संजीवकांची फवारणी अशा बागेत टाळावी. बऱ्याच बागेत वाढ विरोधकाचा वापर जास्त होतो. यातही सायटोकायनीन असल्याने अडचणी निर्माण होतात. तेव्हा अशा फवारण्या टाळाव्यात. यावेळी शेंड्याकडील व बगलफुटी काढून टाकल्याने हा नाजूक व कोवळा डोळा शिल्लक राहतो. या डोळ्यावर दाब जास्त येतो. त्यामुळे नवीन फुटी बाहेर निघतात. ही परिस्थिती पुढील हंगामात पीक घेण्याच्या दृष्टीने फायद्याची नाही. हा 'टायगर बड' फुटणे टाळण्याची आवश्यकता आहे.

पान १४ वर »

GREENHOUSE MANUFACTURERS ASSOCIATION
Plot No: 49, MIDC Floriculture park, Talegaon Dhabade, Tal Maval, Dist Pune – 401507
info@igma.org.in | www.igma.org.in
Registration No: 29138 | PAN: AAEAG1960A
IGMA
सर्व शेतकरी बंधूना
कृषी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
- संरक्षित शेती जसे की पॉलीहाऊस व शेडनेटहाऊस मधील शेती ही काळाची गरज आहे.
- शेतकरी बांधवानी नोंदणीकृत सेवापुरवठादार यांच्याकडूनच पॉलीहाऊस व शेडनेटहाऊस याची उभारणी करावी.
- संरक्षित शेतीमधील तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी IGMA कार्यरत आहे. – अध्यक्ष महाराष्ट्र राज्य

सूर्यफूल
Rama
कृषी दिना निमित्त सर्व शेतकरी बांधवांना हार्दिक शुभेच्छा
निर्माते: रामा कृषि रसायन
Email: bharat@ramagroup.co.in

## सिताफळ उत्पादनाच्या तुलनेत मागणी जास्त



डॉ. नवनाथ कसपटे

पुणे : पुणे जिल्ह्यात जेवढी सिताफळाची आवक आहे, तेवढी देखील आवक दिल्लीमध्ये होत नाही. पुणे शहराच्या तुलनेत दिल्ली मोठी असताना देखील तिथं सिताफळाची आवक कमी होते. दल्लीसह आसपासच्या शहरात सिताफळ हे कित्येक नागरिकांनी फक्त फोटोतच पाहिले आहे. व्यापारी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडून सिताफळ खरेदी करून ते भारताच्या उत्तरेकडे नेऊन विकतात त्यामुळे येणाऱ्या काळात सिताफळाची मागणी वाढून त्यापासून विविध पदार्थ बनवले जातात.(उदा) ज्युस, सेक, आईस्क्रीम हे महाग असणारे पदार्थ तयार करतात. टिकाऊ क्षमत एक वर्षभर होते.असे पदार्थ तयार करण्यासाठी कच्चा माल भरपूर मिळाला तर पदार्थांची मागणी वाढून नागरिकांच्या दररोजच्या आहारात याचा समावेश होईल. इतर पीकाप्रमाणे सिताफळात देखील अळी होते. मात्र योग्य रित्या औषध फवारणी केली तर अळी येऊ शकत नाही. औषध फवारणी साठी वेळापत्रक तयार असेल तर योग्य नियोजन होते. कसपटे यांनी शेकडो एकर सिताफळ लागवड केली व ते नियोजनबद्ध शेती करतात, म्हणूनच सिताफळात अळी होत नसल्याचे ते सांगतात. त्यामुळे व्यापारी ग्राहकांना ठामपणे सांगू शकतात अळी अजीबात निघणार नाही. सिताफळाला सहा महिने पाणी न दिल्याने जमिनी चांगल्या राहतात. पाण्याची बचत होते, कमी पाण्यात सिताफळ लागवड चांगली होते.

देशातील सिताफळाची मागणी भरपूर असून शेतकऱ्यांनी त्याचे नियोजनबद्ध उत्पादन घेतले तर भरपूर शेतकरी सदन होतील असे अखिल भारतीय सीताफळ महासंघाचे अध्यक्ष डॉ. कसपटे यांनी सांगितले.

सीताफळाचा जागतीक पातळीवर विचार केला तर १० ते १२ देशांमधेच फक्त या फळाचं उत्पादन घेतलं जाते. मागील वर्षी एन.एम.के वन गोल्डन वाणास युरोपियन देश लंडन मधे ६०० रूपये किलो दराने विक्री झाली. खर्च वजा जाता १५० रूपये किलो दर मिळाला त्यामुळे जागतीक बाजारपेठेत सीताफळास मोठी संधी दिसत आहे.

> पहिल्या वर्षी चार लाख रूपयाचे उत्पादन घेतले. एक एकरामध्ये ३४० रोपे लावली, उत्पादन घेयाचेहेपाचवेवर्षआहे. मागीलवर्षीसाडेसातलाखरूपयाचेउत्पादनझाले. कमीखर्चातजास्त उत्पादन देणारे फळ आहे. – आण्णासाहेब अडसूळ, प्रगतशील शेतकरी, काळकुप, ता. पाळनेर,

# वाढत्या ओलावा, आर्द्रतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या

» पान ११ वरून

**उपाययोजना**

सायटोकायनीनयुक्त संजीवकांची फवारणी अशा बागेत टाळावी. बऱ्याच बागेत वाढ विरोधकाचा वापर जास्त होतो. यातही सायटोकायनीन असल्याने अडचणी निर्माण होतात. तेव्हा अशा फवारण्या टाळाव्यात. बगलफुटी ८ ते १० दिवसांपर्यंत काढू नयेत. शेंडा पिंचिंग करण्याचे टाळून पुन्हा तीन ते चार पाने वाढू द्यावीत.

फुटी वाढण्याची परिस्थिती नसल्यास जमिनीतून किंवा फवारणीच्या माध्यमातून युरियाच्या (२.५ ते ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे) दोन फवारण्या कराव्यात. किंवा जमिनीतून दीड ते दोन किलो या प्रमाणे ठिबकद्वारे देता येईल. असे केल्यास पुढील शेंड्याकडील वाढ थोड्याफार प्रमाणात होईल. मात्र हा नाजूक टायगर बड फुटणार नाही.

तीन ते चार पानांनंतर नत्र थांबवून पालाशची (३ ग्रॅम प्रति लिटर प्रमाणे) एक फवारणी करावी. शेंड्यावर टिकली मारून पुढील वाढही थांबवता येईल व डोळाही सुप्तावस्थेत राहील.

## काडी परिपक्वतेची समस्या

भारी जमीन असलेल्या बागेत फुटीची वाढ फार जोमात होताना दिसून येते. या वेळी काडी परिपक्वतेचा कालावधी असतो. तळाकडून गुलाबी असलेली फूट पुन्हा हिरव्या ते दुधाळ रंगात परिवर्तित होऊन काडी परिपक्वतेला सुरुवात होते.

या वेळी पाऊस व ढगाळ वातावरण नसावे. पाऊस असल्यास आर्द्रता वाढून वेलीतील जिबरेलिन्सचे प्रमाण वाढून फुटीची वाढ जोमात होईल. या परिस्थितीत काडीची परिपक्वता लांबणीवर जाईल. परिपक्व काडी म्हणजे काडी जवळपास पंधराव्या डोळ्यापर्यंत पूर्ण तपकिरी रंगाची होऊन त्या काडीला काप घेतल्यास त्यातील उपलब्ध पीथ सुद्धा पूर्ण तपकिरी असावा. काही स्थितीत आतील पीथ पांढरा असेल. अशा बागेत छाटणी केल्यास त्या काडीवरून निघालेल्या फुटीमधून गोळीघड निघेल किंवा घड जिरण्याची समस्या निर्माण होईल. अशा बागेत फळछाटणी काही दिवसांसाठी टाळावी. आधी काडीची परिपक्वता करून घ्यावी.

**उपाययोजना**

बागेत पाण्यावर पूर्णपणे नियंत्रण असावे. नत्रयुक्त खतांचा वापर टाळावा. पालाशची फवारणी दर तिसऱ्या दिवशी या प्रमाणे चार ते पाच वेळा करावी.

टिकली मारून शेंडा पिंचिंग करून घ्यावे. काड्या तारेवर बांधून घ्याव्यात.

डॉ. आर. जी. सोमकुंवर, ९४२२०३२९८८
(राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र,





## छोट्या जाहिराती

क्लासिफाइड: १ ओळीकरिता रु. ५००/- पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना: ४ पेड १ फ्री, ५ पेड २ फ्री, ६ पेड ३ फ्री, ७ पेड ४ फ्री, ८ पेड ५ फ्री, ९ पेड ६ फ्री, १० पेड ७ फ्री...

### शेतीविषयक व्यवसाय

#### इतर व्यवसाय

एमएलएम लिडर्सची चिंता संपली. भारतात प्रथमच १००% ऑरगॅनिक अॅग्री एन.पी.के. खते, टॉनिक, कीटकनाशक, अँड हेल्थ युनिक प्रॉडक्ट, युनिक प्लॅन, जॉइनिंग १६०० रु बायनेरी ५०० रुपये रिपरचेस बायनेरी, अवॉर्ड अँड रिवार्ड, होम डेपो कमिशन. महिना ११ लाख रु. कमवा फुल सपोर्ट. मो. ९९५६७३०८०८, ९९५६७१०६०६.

#### कृषी पर्यटन

कृषी/ मेडिको टुरिझम प्रोजेक्ट. डिझायनिंग, कन्सल्टन्सी ट्रेनिंग, इव्हेंट बुकिंगसाठी निसर्ग-निर्मिती ८८८८८६१४८८ / ०२०-२९७०६१४८.

### पशुधन व्यवसाय

#### मत्स्यपालन

आमच्याकडे शेततळ्यावर व तलाव मध्ये जलद गतीने वाढणारे तलावातील शेवाळ १००% कमी होणारे मत्स्यबीज मिळेल. जाती कटल, राहु, सुपरनेस, कोंबडा, मरळ. ठिकाण मत्सेंन्द्रनाथ मत्स्य प्रशिक्षण केंद्र, अ.नगर. मोबा. ९२८४८१९८९८, ८०८७९९७१००. प्रा. रुपचंद बन्सी बळे.

मुंबादेवी फिश सीड् सप्लायर्स आमच्याकडे गोड पाण्यातील जलद गतीने वाढणारे मत्स्यबीज होलसेल भावात मिळेल. किशोर गंगुले : ९५२७४५१२१५ / ८७८८०२८९३४.

### बी - बियाणे

#### बियाणे / रोपे विक्री

आमच्याकडे खात्रीशीर लाल कांदा बीज ९०% उगनशक्तीचे मिळेल, मे. २०२१ चे उत्पादीत केलेले. पत्ता. पहुर ता. जामनेर, जी जळगांव भवानी मंदिराजवळ जामनेर रोड मो.९९७५९६२६०२, ९०२२६७२४५०

#### रोपे / टिश्युकल्चर

कोईमतूर ८६०३२ टीश्यू कल्चर स्टेज-३ ऊस रोपे मिळतील. संपर्क : ९२८४६४५६८६, ८४८४८४६०२७.

### खते / औषधे

#### खते / औषधे विक्री

देशी गाईच्या शेणाचे जैविक खत (बायो ऑरगॅनिक), धन जिवामृत खत गोमुत्रा पासूनचे पिक संवर्धन (टॉनिक) कीड प्रतिबंधन (पेस्ट रिपेलंट) घरच्या बागेसाठी, शेतकऱ्यां साठी, दर्जेदार उत्पादन. ९३२५४०२६८६.

कॉपर, झाईम, सिलीकॉन, ह्युमिक, अमिनो, स्टीकर स्पेडर, फोलविक, स्टीम, सीवीड यांचे उत्पादक. शेतकऱ्यांसाठी खास दरात उपलब्ध. ९७६७५४०५८५ / ७४४७४४२५८५.

डाळींब! पपई!! पपईवरील व्हायरससाठी 'अॅव्हर्टा', डाळींब-तेल्यासाठी 'टेल्बासुपर' वापरा. गोखले अॅग्रो, पुणे ७७४१९७३६२७.WWW.GOKHALEAGRO.COM

### जमीनविषयक

#### जमीन कसण्यासाठी/ मक्त्याने देणे

घोम बलकवडी, कॅनॉलखाली १४ एकर बागायती काळी कसदार जमीन वार्षिक एकरी ३० हजार भाड्याने देणे. मु. पो. खंडाळा, जि. सातारा मो ९९७०१११९१६

### शेतीविषयक अन्य विषय

#### फलोत्पादन/ फळप्रक्रिया

आंबा केळी पपई, डाळिंब, पेरू, शेवगा लिंबू, सिताफळ, ड्रॅगनफ्रूट च्या फगबागा जैविक कुंपणासह व मजुरांसह डेव्हलप करून देऊ. संपर्क : ९८५०६०१६४१.

**वाचकांसाठी निवेदन**

सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत 'सकाळ' व्यवस्थापन हमी देऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.
-वरिष्ठ व्यवस्थापक, अॅग्रोवन

**जाहिरातींसाठी संपर्क :**
● पुणे - प्रदिप : ७५०७७७५०३७, संग्राम : ९१५८०९१९१९
● नाशिक - चेतन : ९१६८६६११५८ ● कोल्हापूर - शीतल : ९८८११२९२९३
● मराठवाडा - दत्ता : ८६२४०२३२५६ ● विदर्भ - प्रशांत : ८८८८७१८६००
● अहमदनगर - सचिन : ८८८८९६६५८२ ● खान्देश - चेतन : ९८८११३६०३५
● सातारा - संग्राम : ९१५८०९१९१९ ● सोलापूर - प्रदिप : ७५०७७७५०३७